शुक्रवार दि.१७ जानेवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१२८ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# बारामतीसारखाच विकास मतदारसंघात करणार: सकाळी ६ वाजता सुरु होते काम

## पंकजा मुंडे अजित पवारांच्या कामाने भारावल्या

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बारामती (वृत्तसंस्था)**

बारामतीत विविध विकासकामांच्या उद्घाटनांच्या निमित्ताने आलेल्या राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी बारामतीच्या विकासाची पाहणी केली. बारामती शहरासह मतदारसंघात झालेल्या सर्वांगीण विकासाने त्या अक्षरशः भारावून गेल्या. बारामतीच्या प्रत्येक विकासकामाकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारकाईने लक्ष असते. दादांच्या व्यक्तिमत्त्वातील काटेकोरपणा, शिस्तबद्धता, वक्तशीरपणा, नियोजनबद्धता, झपाटून काम करण्याची पद्धत यांसह खूप काही गोष्टी अजितदादांकडून शिकण्यासारख्या असल्याचे सांगत त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे तोंडभरून कौतुक केले. बारामतीच्या धर्तीवरच आपल्या स्वतःच्या मतदारसंघासह मराठवाड्याचा विकास करण्याचा निर्धार यावेळी त्यांनी व्यक्त केला.

राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेच्या उद्घाटनाच्या निमित्ताने पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे या बारामतीच्या दौऱ्यावर आहेत. या निमित्ताने त्यांनी बारामती शहरासह बारामती तालुक्यातील विविध विकासकामांना भेट देऊन त्यांची सविस्तर माहिती घेतली. बारामतीच्या विकासाबद्दल भरभरून बोलताना त्या म्हणाल्या, एका वेगळ्या विकासाच्या दृष्टीतून बारामती आणि बारामतीचा विकास बघण्याचा आज योग आला. बारामती मतदारसंघात झालेली विविध विकासकामे, त्यांचा दर्जा हा अत्यंत सुंदर आहे. बारामती मतदारसंघातील प्रत्येक कामावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारकाईने लक्ष असते. त्यांचा दिवस सकाळी सहा वाजता सुरू होतो. प्रत्येक काम नियोजनबद्ध पद्धतीने करण्यावर त्यांचा भर असतो. त्यामुळेच त्याचे प्रतिबिंब बारामतीतील प्रत्येक विकासकामांमध्ये दिसत आहे. काटेकोरपणा, वक्तशीरपणा यांसह उपमुख्यमंत्री अजित दादांच्या अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. बारामतीच्या विकासाशी अजितदादांचे वेगळे नाते निर्माण झाले आहे, त्यांच्या प्रदीर्घ अनुभवासह अनेक वर्षे सत्तेत असल्याचा फायदा बारामतीच्या विकासात निश्चित झालेला आहे. बारामतीत झालेल्या विकासकामांच्या धर्तीवरच माझ्या मतदारसंघासह मराठवाड्याचा विकास करण्यासाठी मी प्रयत्नशील राहीन, असा निर्धार यावेळी व्यक्त करत मंत्री पंकजा मुंडे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह बारामतीच्या विकासाचे विशेष कौतुक केले.



# प्रा.पुरूषोत्तम किलबिले आदर्श पुरस्काराने सन्मानित

लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत**





जिजामाता उच्च माध्यमिक विद्यालय,दुधा ता.जि. बुलडाणा येथील प्रा.पुरूषोत्तम किलबिले यांना नुकताच राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे. शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असल्याने प्रा. पुरुषोत्तम किलबिले यांना स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी महासंघ व मंत्रालय समन्वय समिती यांच्या संयुक्त विद्यमाने सदर पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

मागील १७ वर्षापासून शिक्षण क्षेत्रात प्रा.पुरुषोत्तम किलबिले प्रामाणिकपणे आपले कर्तव्य बजावत असून आता पर्यंत त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले आहेत. आपल्या मितभाषी स्वभावाने त्यांनी अनेकांची माने जिंकली असून जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना उद्भवणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी किलबिले सर सतत प्रयत्नशील असतात.सामाजिक बांधिलकी तसेच पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला असून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल याकडे त्यांचे विशेष लक्ष असते. शालेय उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन कला,क्रिडा संस्कृतीची जोपासना प्रा.किलबिले करत असतात. हा आदर्श पुरस्कार मिळाल्याने विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षांव होत आहे.

# वाचन संकल्प महाराष्ट्राचाग्रंथ प्रदर्शनास वाचकांचा प्रतिसाद

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्मानगर । गणेश लोखंडे**






उस्माननगर ता. कंधार येथील सर्वाधिक ग्रंथ भांडार असलेल्या श्री शारदा वाचनालय मोठी लाठ ( उस्माननगर) येथे १ जानेवारी ते १५ जानेवारी दरम्यान शासनाच्या सुचनेनुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम घेण्यात आला. यात गावातील प्रतिष्ठित वाचक, विद्यार्थी, शिक्षक यांनी मोठा प्रतिसाद दिला. उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य मुंबई व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय नांदेड यांच्या आदेशानुसार या उपक्रमाचे श्री शारदा वाचनालयाच्या वतीने आयोजन करण्यात आले होते. या वाचन संस्कृती वाढावी या उद्देशाने साजरा केलेल्या उपक्रमात सामुहिक वाचन, वाचन संवाद, ग्रंथ प्रदर्शन, वाचन कौशल्य कार्यशाळा, पुस्तक प्रशिक्षण व कथन, कथाकथन उपक्रम घेण्यात आले.

यावेळी भाजपचे राष्ट्रीय परिषद सदस्य तु. शं. वारकड,माजी मुख्याध्यापक बा. दे. कुलकर्णी,समता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अरुण देशपांडे, मुख्याध्यापक ग. रं. सोनवणे, राजीव सोनटक्के, नरेंद्र वारकड, शंकर पांचाळ आदींची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ग्रंथपाल सूर्यकांत मालीपाटील, नारायण पांचाळ यांचा सत्कार करण्यात आला. या उपक्रमात वाचन कौशल्य कार्यशाळेत सम्राट अशोक प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. शाळेचे मुख्याध्यापक राहुल सोनसळे यांनी यावेळी वाचनालयातील या उपक्रमाचे कौतुक केले यावेळी वाचनालयाच्या वतीने सोनसळे यांचा ग्रंथ भेट देवून सन्मान केला. या ग्रंथ प्रदर्शनात स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ जयंती निमित्त त्यांच्या जिवनावर आधारित ग्रंथसंपदेचे प्रदर्शन आयोजित केले होते. ग्रंथ हेच गुरू ब्रीदवाक्य सार्थकी लावणारे श्री शारदा वाचनालयाच्या वतीने आयोजित या उपक्रमाचे गावातील वाचकांनी कौतुक केले आहे.

# इंदापूरच्या भिगवण बाह्य रस्त्याच्या साईडपट्टीवर मुरुमाऐवजी मातीचा वापर

## सहा कोटी १६ लाखाच्या कामात मोठा भ्रष्टाचार

लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

महाराष्ट्र राज्यामध्ये भारतीय जनता पार्टी महायुतीचे सरकार असून हे सरकार रस्त्यांच्या कामाला महाराष्ट्रात प्रथम प्राधान्य देत असल्याचे पाहायला मिळत असून करोडो रुपयांचा निधी खर्च करत आहे. परंतु इंदापूरच्या भिगवण येथील रस्त्याच्या निधीचा लोण्याचा गोळा ठेकेदाराने स्वताच्या घरी पळवून नेहला अशी परिस्थिती झाली आहे. भिगवण ता. इंदापूर येथे पुण्याहून राशिन–कर्जत कडे जाणाऱ्या बायपास रोडचे नविन काम सुरू असून सदरचे काम हे पाच कोटी १६ लाख रुपयांचे असून या कामाच्या साईट पट्टी वरती ठेकेदाराने मुरमाऐवजी मातीचा वापर केलेला दिसून येत आहे. यामुळे होत असलेला रस्ता किती दिवस टिकणार हे मात्र न बोललेले बरे, या ठिकाणी फक्त ठेकेदाराचे घर भरण्याचे काम सुरु असताना प्रशासन मात्र मूग गिळून बसलेले पाहायला मिळत आहे. याच कामाविषयी सार्वजनिक बांधकाम विभागाचे संबंधित अधिकारी यांना संपर्क साधला असता बघतो, करतो, विचारतो अशी उडवाउडीची उत्तरे देण्यात आली. आता या ठेकेदारावर काय कारवाई होणार हे पाहणं औत्सुक्याचे ठरेल.




# स्वामी चिंचोलीच्या असीम शेखची कबड्डीत स्पर्धेत राष्ट्रीय स्तरावर निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

स्वामी चिंचोली (ता.दौंड) येथील असीम जुबेर शेख (वय १८) याची उत्तराखंड येथे होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या कुमार संघात निवड करण्यात आली आहे. जानेवारी महिन्यात ही स्पर्धा आयोजित करण्यात आली असून असीम शेख हा शेख वस्ती स्वामी चिंचोली येथील गरीब कुटुंबातील मुलगा असून गेली सात वर्षे तो कबड्डी खेळत आहे. तो बारामती येथील स्पोर्ट्स अकॅडमी येथे सराव करत असून देशाला कबड्डी खेळात सुवर्णपदक प्राप्त करून द्यायचे आहे.असा विश्वास असीम शेख याने यावेळी व्यक्त केला.



असीमच्या महाराष्ट्र संघातील निवडीचे स्वामी चिंचोली परिसरातून स्वागत होत आहे.

असीम शेख हा अतिशय गरीब कुटुंबातील मुलगा असून त्याचा आदर्श स्वामी चिंचोली आणि परिसरातील युवकांनी घ्यावा.त्याने कबड्डी स्पर्धेत आई,वडीलांचा,गावाचा आणि महाराष्ट्राचा आजून नवलौकिक वाढवावा. तो अतिशय जिद्दी असून कबड्डी स्पर्धेत चांगली कामगिरी करणार असा मला आत्मविश्वास आहे. अझरभाई शेख मा.सरपंच स्वामी चिंचोली.

# मुखेड तहसील कार्यालयात सर्वपक्षीय कार्यकर्त्यांकडून कार्यालयात ठिय्या आंदोलन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

मुखेड शहरातील विविध प्रश्नांसाठी सर्वपक्षीय कार्यकर्त्यांकडून सोमवारी तहसील कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज यांचा आच्छादन केलेला पुतळा, उपजिल्हा रुग्णालयातील गैरसोई, नगरपरिषदेने एक महिन्यापूर्वी बनविलेले रस्ता फोडून पाइप लाइन टाकणे, स्वच्छता आदी समस्यांसाठी तहसीलदारांसोबत चर्चा केली. यावेळी नगरपरिषदेने दुर्लक्ष केल्यास जिल्हाधिकारी यांना भेटून आंदोलन करणार, असा इशारा दिला.

मुखेड येथील शासकीय विश्रामगृहात सोमवारी शहरातील सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची डॉ. श्रावण रॅपनवाड यांच्या अध्यक्षतेत बैठक पार जिल्हाधिकाऱ्यांना भेटून प्रश्न सोडविणार छत्रपती शिवाजी महाराज पुतळा आच्छादन विषयावर लवकरच जिल्हाधिकारी यांना भेटून चर्चा करणार आहे.–राजेश जाधव, तहसीलदार तथा प्रभारी मुख्याधिकारी पडली. बैठकीत शिवाजी महाराज पुतळा, श्री वीरभद्र स्वामी मंदिर, छत्रपती संभाजी महाराज पुतळा आदींसह शहरातील आरोग्य, स्वच्छता, पाणीपुरवठा व रस्ते बांधकाम या विषयावर आंदोलनात्मक पवित्रा घेण्याचे ठरविण्यात आले. बैठकीनंतर सर्व कार्यकर्त्यांनी तहसीलमध्ये जाऊन तहसीलदारांच्या दालनात ठिय्या मांडून या प्रश्नांना वाचा फोडली. यावेळी शिवसेना उबाठा शहर प्रमुख शंकर चिंतमवाड, काँग्रेस शहराध्यक्ष हनमंत नारनाळीकर, शिवशंकर कलंबरकर, राजमुद्राचे जिल्हाध्यक्ष सचिन इंगोले, अशोकराव बचेवार, युवा सेना शहरप्रमुख बालाजी बाबळे, एपीजे अब्दुल कलाम समाजसेवा समिती अध्यक्ष बबलू शेख, सुरेश बेळीकर, अण्णासाहेब जाहीरे, पुतळा समिती आंदोलक श्याम इंगोले, बालाजी इंगोले आदी उपस्थित होते.



# द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे व पत्रकार बंधवाचे श्री.राहूल दादा करपे यांनी केले कौतुक

## पत्रकारांवर गुन्हे दाखल होणार नाही यासाठी प्रयत्नशील राहणार-पी.आय संदेश केंजळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**हवेली | संतोष कदम**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सभागृह शिरूर येथे द युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या वतीने वतीने दिनदर्शिका २०२५ चे प्रकाशन व नियुक्तीपत्र वाटप या कार्यक्रम सोहळा मोठ्या आनंदाने थाटामाटात पार पडला. महाराष्ट्र राज्य द युवा पत्रकार संघ, पुणे जिल्हा शिरूर तालुका कार्यकारिणी तर्फे तयार करण्यात आलेल्या २०२५ या नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन कार्यक्रमाचे अध्यक्ष योगीराज समूहाचे चेअरमन राहुल करपे, शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस अधीक्षक संदेश केंजळे, द युवा ग्रामीण पत्रकार संघांचे संस्थापक अध्यक्ष अन्सार शेख यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.यावेळी कार्यक्रमाचे आयोजक द युवा पत्रकार संघटना शिरूर तालुका अध्यक्ष विजय कांबळे, उपाध्यक्ष विश्वनाथ घोडके व सर्व पदाधिकारी शिरूर कार्यकारिणी,यांच्या निमंत्रणास मान देऊन बाळासाहेब काळे , शिवसेना तालुकाप्रमुख पोपट शेलार , संतोष आरवडे , फिरोज सैय्यद, बाळासाहेब काळे , राजेंद्र जाधव सरपंच दहिवडी,मंगल ताई कवठाळे,डॉ सुनीताताई पोटे ,सीमाताई पवार,राहूल कुल, महाराष्ट्राची भूमी संपादक आंनदा बारवकर, संतोष लटांबळे,संपत सोनवणे, रोहित वाळके,राज्य सहसचिव विवेकानंद फंड, राज्यसदस्य संतोष कदम,पुणे जिल्हा अध्यक्ष शकील मणियार,कार्याध्यक्ष स्वरूप गिरमकर आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी दीप प्रज्वलन ,सावित्रीबाई फुले,छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली.यावेळी पत्रकारांना संबोधित करताना राहुल दादा करपे पाटील म्हणाले की द युवा ग्रामीण



पत्रकार संघटनेचे कार्य हे खऱ्या अर्थाने कौतुकास्पद आहे. पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे त्यांचा योग्य मानसन्मान आपण केला पाहिजे. खऱ्या अर्थाने समाजाला न्याय देण्याचं काम हे पत्रकार बांधव करित असतात.द युवा ग्रामीण पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष अन्सार शेख हे बोलताना म्हणाले की आमचे पत्रकार बांधव खऱ्या अर्थाने गोरगरीब यांच्यासाठी काम करतात,त्यांच्या समस्यांचा पाठपुरावा करत असतात, यावेळी काम करत असताना पत्रकाराना अनेक गुन्ह्यांमध्ये अडकवलं जातं,त्यांच्यावरती अनेक गुन्हे दाखल केले जातात अशी खंत व्यक्त केली. शिरूर पोलीस स्टेशनचे पोलीस अधीक्षक संदेश केंजळे हे बोलताना म्हणाले की पत्रकारांवरती अनेक कलमे आणि गुन्हे दाखल होतात परंतु ते गुन्हे दाखल होणार नाही त्यासाठी निश्चितच मी शिरूर तालुक्यामध्ये प्रयत्नशील राहील. याप्रसंगी सदर दिनदर्शिका अत्यंत सुबक असून पूर्ण वर्षाची महत्वाची माहिती देण्यात आली आहे. यावेळी सर्व उपस्थित मान्यवरांनी पत्रकार संघाच्या या उपक्रमाचे कौतुक केले असून भविष्यात पत्रकार संघाने विधायक कार्य करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाराष्ट्र राज्य सहसचिव श्री. विवेकानंद फंड सर यांनी केले. व शिरूर तालुका अध्यक्ष विजय कांबळे यांनी आभार मानले. महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

# रांजणगाव येथील वि.वि.का.स. सोसायटीच्या चेअरमनपदी राजेश लांडे


■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती | विवेकानंद फंड**

आज दि.१६ जानेवारीला रांजणगाव गणपती विविध विकास कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन पदी राजेश दत्तोबा लांडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली असल्याची माहिती सोसायटीच्या सचिव आरती शेळके-गोरे यांनी दिली.

मावळते चेअरमन फक्कडराव धुमाळ यांनी राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर चेअरमन पदी राजेश लांडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य शेखर पाचुंदकर , राहुल पाचर्णे, युवा



सेनेचे जिल्हाप्रमुख व सोसायटीचे माजी चेअरमन बापूसाहेब शिंदे, शिरूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष रवी काळे, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष राजेंद्र नरवडे, भारतीय जनता पार्टीचे माजी तालुका अध्यक्ष भगवान शेळके, कुकडी सहकारी साखर कारखान्याचे संचालक अशोक वाखारे, घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक कैलास सोनवणे

, देवस्थान ट्रस्टमध्ये माजी अध्यक्ष दत्तोबा लांडे, माजी सरपंच सर्जेराव खेडकर, राजमुद्रा पतसंस्थेचे अध्यक्ष दत्तात्रय पाचुंदकर, माजी उपसरपंच राहुल पवार,धनंजय पवार,अजय गलांडे, सुरेखा प्रकाश लांडे,दादामामा शेळके, गणेश लांडे,काळुराम पाचुंदकर हुंडेकरी,गणेश पाचुंदकर,प्रताप पाचुंदकर , गणेश लवांडे,सागर देवकर यांसह विविध संस्थांचे आजी- माजी पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बुलढाण्यात आज निर्यातदारांसाठी कार्यशाळा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बुलढाणा | ज्ञानेश्वर बुधवत**

जिल्हा उद्योग केंद्रामार्फत आज दि. १७ जानेवारी रोजी बुलडाणा अर्बन रेसिडेन्सी क्लब येथे निर्यातदारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या हस्ते होणार आहे. जिल्ह्यातील निर्यातदारांनी कार्यशाळेला उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी केले आहे.

निर्यात क्षेत्रात जागरूकता, उद्योजकता आणि शाश्वत आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राच्या पुढाकाराने उद्योग विकास आणि निर्यात आयुक्त दीपेंद्र सिंह कुशवाह यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत अमरावती क्षेत्राचे उद्योग सह संचालक निलेश निकम हे महाराष्ट्रातील निर्यात उपक्रमांविषयी माहिती देतील. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील बुलढाणा जिल्ह्यात सूक्ष्म, लघू आणि मध्यम (एमएसएमईएस) उद्योग वाढीची संभाव्यता आणि पुढील वाटचालीविषयी मार्गदर्शन करतील. जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे बुलढाणा जिल्ह्याच्या औद्योगिक प्रगतीविषयी माहिती देणार आहेत. सहायक संचालक स्नेहल ढोके ह्या केंद्र सरकारच्या निर्यात प्रोत्साहन योजनांची माहिती देतील. कार्यशाळेच्या मध्यातरानंतर सल्लागार अंकीत गुप्ता हे बुलढाणा निर्यात कृती आराखड्याविषयी माहिती देतील. डाक निर्यात केंद्राविषयी अधीक्षक जी.एन. जाधव माहिती देतील. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोज ढगे कृषी विभागाच्या निर्यात प्रोत्साहन योजनेविषयी माहिती देतील. कार्यशाळेच्या अंतिम टप्प्यात प्रश्नोत्तर घेतल्यानंतर समारोप करण्यात येईल. या कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी निर्यातदार, उद्योजकांनी https://forms.gle/PQr1QYgwZwwL5mTy7 या गुगल फॉर्मवर माहिती भरुन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी केले आहे.

## सिंदखेड राजा शहरात भर दिवसा ५० हजाराची चोरी

# पंचायत समितीच्या आवारातून जेष्ठ सेवा निवृत्त कर्मचाऱ्याचे पन्नास हजार रुपये लंपास

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | ज्ञानेश्वर बुधवत**



तालुक्यातील साठेगाव येथील सेवानिवृत्त कर्मचारी नागरे यांचे पंचायत समितीच्या आवारातून लुना मोटारसायकल वर असलेली पन्नास हजार रूपायांची बॅग भरदिवसा अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना १६ जानेवारी रोजी दुपारी १२ ते१ वाजे दरम्यान घडली आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की साठेगाव येथील सेवानिवृत्त औषध निर्माता संखाराम तुकाराम नागरे वय ८५ यांनी दवाखान्यात जाण्यासाठी सिंदखेड राजा येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेतून एक लाख रुपये रक्कम काढली या रकमेतील पाचशे रुपये नोटांचे एक बंडल खिशात ठेवले व १०० रूपये नोटांचे पाच बंडल काळ्या रंगाच्या हॅड बॅग लुना मोटारसायकलच्या हॅनडला लटकवून पंचायत समिती आवारात आले असता त्यांना दम लागल्यामुळे पंचायत समिती आवारातील पाण्याच्या टाकीजवळ बसले यावेळी अज्ञात चोरट्यांनी लुना मोटारसायकलच्या हॅनडला लावलेली पन्नास हजार रुपये किंमतीची हॅड बॅग चोरून नेली ज्यावेळी सेवानिवृत्त जेष्ठ नागरिक आपल्या लुना मोटारसायकल कडे आले त्यावेळी लुना मोटारसायकला लटकवलेली हॅड बॅग चोरी झाल्याचे निदर्शनास आले यावेळी जेष्ठ नागरिकांनी सदर प्रकरणची तक्रार सिंदखेड राजा पोलिस स्टेशन मध्ये दाखल केली. यावरून सिंदखेड राजा पोलिसांनी सिंदखेड राजा पंचायत समितीच्या आवारात पाहणी केली असता येथील सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्याचे निदर्शनास आले सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या तक्रारी वरून सिंदखेडराजा पोलिसांनी अज्ञात चोरट्या विरोधत गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल अनिल खार्डे करीत आहे.

## प्रभारी गटविकास अधिकारी यांच्या काळात तिसरा डोळा बंद

पंचायत समिती सिंदखेड राजा मध्ये शासनाने लाखो रुपये खर्च करून सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. पण या कॅमेऱ्याचा कोणताही उपयोग या पंचायत समितीच्या कामासाठी होताना दिसून येत नाही. तत्कालीन गटविकास अधिकारी वेणीकर यांच्या कालखंडामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे चालू होते. परंतु आज प्रभारी गटविकास अधिकारी यांनी पदभार मोहर यांनी स्वीकारल्या पासून सीसीटीव्ही कॅमेरे बंदच आहेत.




माहोर प्रभारी गटविकास अधिकारी यांच्याकडे देऊळगाव राजा आणि सिंदखेडराजा पंचायत समितीचा कार्यभार असल्यामुळे एक दिवस सिंदखेड राजा एक दिवस देऊळगाव राजा असे कामकाज चालू असते त्यांच्या या कामकाजावर तालुका सरपंच संघटना ही नाराज आहे. तालुक्यातील जनता विकास कामासाठी सिंदखेड राजा पंचायत समितीमध्ये आल्यानंतर गटविकास अधिकारी गायब असतात. त्यामुळे सर्वसामान्य जनता ही नाराज आहे. सिंदखेड राजाला कायम स्वरुपी गटविकास अधिकारी मिळेल का असा सूर सुद्धा सर्वसामान्य जनतेतून निघत आहे.

# शेतकरी नेते मारोती गीते यांचा संघर्षमय प्रवास

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव | महादेव हरण**

शेतकरी पुत्र ते शेतकरी नेते, मारोती गिते यांच्या संघर्षमय प्रवास जन्म १०/ ६ /१९९१रा सिंनगी नागा ता, सेनगाव जि, हिंगोली येथे झाला शिक्षण बीए ग्रॅज्युएशन पूर्ण झाले असून अगदी लहान वयात १४ जानेवारी २००५ रोजी वडिलांचे निधन झाले त्यानंतर घरादारांची सर्व जिम्मेदारी त्यांच्यावरच येऊन ठेपली अगदी लहान वयातच जिम्मेदारी पडल्याने शिक्षणाबरोबरच शेतामध्ये देखील कामाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन ठेपली शिक्षण चालू असतानाच देशाची सेवा करण्यासाठी प्रश्न पडू लागले जागोजागी भ्रष्टाचार राग द्वेष तिरस्कार अशी भावना समाजामध्ये दिसू लागली त्यामुळे समाजाला एकात्मतेची दिशा देण्यासाठी त्यांनी १२ जानेवारी २०१६ पासून समाजकार्याकडे झेप घेण्यास सुरुवात केली गावामध्ये महापुरुषांच्या जयंती साजरी करत महापुरुषांचे विचार जनमानसात प्रेरित करण्याचे काम करत गोरगरीब शेतकऱ्यांचे प्रश्न शासन प्रशासनासमोर मांडत व न्याय न्याय मिळवून देण्याचे काम करीत राहिले निवेदन, आंदोलन, मोर्चा, पैदल मोर्चा , बोंबाबोंब आंदोलन ,धडक गाडी बैल मोर्चा ,मोटार सायकल रॅली मोर्चा ,पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन, सोयाबीनचे तोरण बांधून आंदोलन सोयाबीनची होळी पिक विमा च्या पावत्याची होळी करून आंदोलन शेवटी न्याय मिळेपर्यंत आंदोलन त्यामध्ये शेतकऱ्यांचे प्रश्न दिव्यांग बांधवांचे प्रश्न विद्यार्थ्यांचे प्रश्न शेतीमालाच्या भावाचे प्रश्न शेतीसाठी लागणाऱ्या पाण्यासाठी प्रश्न राशन यासाठी प्रश्न असे सर्वसामान्यांचे प्रश्न शासन दरबारी मांडून पाठपुरावा करून सर्वसामान्य जनतेला न्याय मिळवून देण्यासाठी धडपड करणारा हिंगोली जिल्ह्यातील एकमेव शेतकरी पुत्र मारोती गिते असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही कोरोनाच्या काळामध्ये गावाबरोबरच जिल्ह्यातील नागरिकांना योग्य आवाहन त्याचबरोबर सेनिटाइझर वाटप मास्क वाटप व लसीकरण करून घ्या असे आवाहन देखील मारोती गीते यांनी वेळोवेळी नागरिकांना दिले स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव निमित्त पर्यावरणाबद्दल जनजागृती त्याचबरोबर



गावामध्ये झाडे वाटप राष्ट्रीय ध्वज वाटप व ग्रामपंचायतला अमृत महोत्सवानिमित्त आर्थिक देणगी देणारे असे महान कार्य करणारे समाजासाठी रात्रंदिवस एक करून झटत राहणारे बऱ्याच पुरस्काराने सन्मानित सामाजिक कार्यकर्ता तथा शेतकरी नेते हा ग्रामपंचायत मार्फत त्यांच्या नावावर नोंद करण्यात आली व पुढे उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ता तहसील कार्यालय सेनगाव यांच्यातर्फे सामाजिक कार्यकर्ता म्हणून सन्मानपत्र त्यांच्या नावावर आहे अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघटनेच्या वतीने शेतकरी जिल्हा भूषण सन्मानपत्र पंचायत समिती कार्यालय तर्फे उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ता सन्मानपत्र व सामाजिक कृतज्ञता पुरस्कार यशवंत संघर्ष सेनेच्या तर्फे त्यांना मिळाला आहे ते गोरगरीब जनतेसाठी सदैव तत्पर असतात ते स्वतःच्या घराचा विचार न करता रात्रंदिवस समाजासाठी काम करतात व त्यांचे ध्येय धोरणे महापुरुषांच्या वाटेकडे बघून टाकतात व भारत विश्वगुरू बनवण्यासाठी ते मार्गदर्शन करत असतात ते शासन प्रशासनाबरोबरच नागरिकाला सुद्धा योग्य आवाहन करतात व समाजासाठी ते निस्वार्थ मनाने काम करतात शेतकऱ्यांच्या जनावरासाठी देखील वेळो वेळी लसीकरण लंपी आजारासाठी उपाय योजना लशी करन शिबिर वृक्षारोपण शिबिर वह्या पुस्तके वाटप बेटी पढाव बेटी बचाव उपक्रम झाडे लावा झाडे जगवा उपक्रम मुलीच्या वाढदिवसानिमित्त झाडे वाटत डोळे तपासणी शिबिर असे समाज हिताचे उपक्रम राबवून हिंदू धर्मासाठी भागवत गीता शालेय अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट करण्यासाठी पुढाकार त्यांच्या या कार्याला आज जवळपास नऊ वर्ष सामाजिक कार्याचे पूर्ण झाले त्यांना बऱ्याच पक्षामधून पक्षांमध्ये येण्यासाठी ऑफर सुद्धा आल्या मात्र ऑफरला ठोकर देत नको पक्षाची चाकरी समाजसेवा हीच माझी भाकरी म्हणून ते निस्वार्थ काम करतात त्यांच्या या निस्वार्थ कामाची शासन व प्रशासन दखल घेऊन त्यांना राज्यपाल नियुक्त आमदार करण्यात यावे अशी चर्चा हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी वर्गात व सर्व सामान्य जनते मध्ये होताना दिसत आहे कारण एका गरीब शेतकऱ्यांच्या पोटी जन्म घेऊन शेतकऱ्यांच्या अडीअडचणी जवळून पाहणारा आणि पाहून त्या अडचणीवर मात करणारा शेतकऱ्यांचा खरा हिरा शेतकरी नेते मारोती दगडू गिते हे एक शेतकऱ्यांसाठी सक्षम नेतृत्व आहे आता यावर माननीय राज्यपाल महोदय मारोती गिते यांना राज्यपाल नियुक्त आमदार करतील का हे पाहणे तेवढेच महत्त्वाचे ठरेल.

# नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर वराडकर महाविद्यालयात चर्चासत्र संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**दापोली । ज्ञानेश्वर बुधवत**



वराडकर बेलोसे महाविद्यालय, दापोली आणि अमृतेश्वर महाविद्यालय, विंझर यांच्या सामंजस्य करारांतर्गत, १५ जानेवारी २०२५ रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (छएझ २०२०) आणि विद्यमान शैक्षणिक क्षेत्रातील अडचणी या विषयावर ऑनलाईन सेमिनार संपन्न झाला. Google Meet या डिजिटल प्लॅटफॉर्मवर पार पडलेल्या या सेमिनारला शिक्षणक्षेत्रातील नामवंत तज्ज्ञांनी उपस्थिती दर्शवली.

कार्यक्रमाची सुरुवात वराडकर बेलोसे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड यांच्या प्रेरणादायी उद्घाटनपर भाषणाने झाली. त्यांनी छएझ 2020 धोरणाची विस्तृत मांडणी करत त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक लवचिक शिक्षण प्रणाली, मातृभाषेतील शिक्षण, आणि कौशल्य विकासावर भर दिला. शैक्षणिक धोरण केवळ शिक्षणाचा आराखडा बदलणारे नव्हे, तर सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाचा टप्पा आहे, असे ते म्हणाले.

उद्घाटन प्रसंगी अमृतेश्वर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संजीव लाटे यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यांनी NEP 2020 च्या अंमलबजावणीतील समावेशकता आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधींवर भर दिला. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामीण व शहरी विद्यार्थ्यांमधील दरी कमी करणे ही काळाची गरज आहे, असे ते म्हणाले. त्यांनी अभ्यासक्रमातील कौशल्याधारित उपक्रमांची महत्त्वपूर्ण भूमिका स्पष्ट केली.मुख्य सत्रांमध्ये विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. कऱ्हाड यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि उच्च शिक्षणातील नवकल्पना या विषयावर धोरणाचे उद्दिष्ट आणि त्यातील नवकल्पनांवर प्रकाश टाकला. प्रा. डॉ. राहुल कांबळे यांनी खट–उ व गुणवत्ता सुधारणा या विषयावर चर्चा करत संस्थात्मक गुणवत्ता वृद्धीसाठी आधुनिक उपाययोजनांची माहिती दिली. प्रा. डॉ. गणेश मांगडे यांनी कल्याणकारी अर्थशास्त्र व NEP च्या आर्थिक परिणामांवर मांडणी केली. प्रा. डॉ. जयश्री गव्हाणे यांनी कॉमर्स शिक्षणातील तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रा. तेजस रेवाळे यांनी लायब्ररी विज्ञानातील नवकल्पना यावर विचार मांडले.

साहित्य व सामाजिक परिवर्तनावर प्रा. दीपक गडकर यांनी प्रखर भाष्य करत, साहित्य हा समाजाचा आरसा असून सामाजिक प्रश्नांवर जागरूकता निर्माण करण्यात लेखकांनी पुढाकार घ्यावा, असे प्रतिपादन केले.

समारोप सत्रात डॉ. भारत कऱ्हाड यांनी संपूर्ण सेमिनारचा आढावा घेतला आणि संशोधन निबंधांचा संकलित GIST रुपी Compendium तयार करण्यात येणार असल्याची घोषणा केली. शेवटी प्रा. डॉ. गणेश मांगडे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. सौ. स्कंधा खेडकर यांनी यशस्वीरीत्या पार पाडले.या सेमिनारमुळे NEP 2020 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपयुक्त दिशा मिळाली आणि शिक्षणातील आव्हाने व उपाय यावर सखोल चर्चा झाली.

# मराठवाडा शिक्षक आमदारानी साजरा केला चिमुकलीचा वाढदिवस

लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । प्रतिनिधी**




मराठवाडा शिक्षक आमदार म्हणून शिक्षक क्षेत्रातील सम्राट आमदार विक्रम काळे साहेबांनी माहूरदौरा आले असता त्यांचे निकटवर्तीय प्राध्यापक प्रवीण बिरादार यांच्या कन्येला शुभेच्छा देण्याचाआपला मोह न आवरता कु प्रीशा प्रवीण बिरादार या चिमुकलीच्या वाढदिवसाला हजेरी लावली आणि शुभेच्छा दिल्या

सर्वांना लाडके असणारे बाप्पा आमदार विक्रम काळे आपल्या कार्यकर्त्यासोबत नाळ जोडून ठेवण्यासाठी आणि शिक्षकांच्या सुखदु:खात सहभाग नोंदणी सह आपले प्रेम आपुलकी जिव्हाळा जपणारा म्हणजेच शिक्षक आमदार विक्रम काळे साहेब यांच्या उपस्थितीत वाढदिवसाचा सोहळा होता.

यावेळी साहेबांसोबत माहूर किनवट चे युवा नेतृत्व विनायक गव्हाणे, विक्रम देशमुख इत्यादीनी उपस्थित दर्शविली वाई बाजार येथील रत्नी बाई प्रायमरी इंग्लिश स्कूलमध्ये हा कार्यक्रम साजरा करण्यात आला शाळेचे संचालक मा.प्राचार्य विलास राठोड मुख्याध्यापिका राठोड मॅडम यानी कार्यक्रमाचे आयोजन केले होते यावेळी काळेसाहेब बोलताना असे म्हणालेत देशाचे भवितव्य घडविणाऱ्या चिमुकले आणि ग्रामीण भागामध्ये इंग्रजी धडे ही शाळा आणि यामधून ग्रामीण भागातून विद्यार्थी सुद्धा चांगल्या पद्धतीने घडतात याला मेहनत सुद्धा जास्त घ्यावी लागते हा ध्यास या संस्थेच्या अध्यक्षनी घेतलेला आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदनच करतो व त्याच बरोबर कू .प्रिषा हिला वाढदिवसानिमित्त तिच्या आयुष्यामध्ये हे यश संपादन करून तिचे आयुष्य उज्वल देशाच्या हितासाठी कामी यावी हीच ईश्वरचरणी प्रार्थना करून तिला आशीर्वाद शुभेच्छा देण्यात आले यावेळी शाळेतील विद्यार्थी व शिक्षक शिक्षक तर कर्मचारी हे सर्व उपस्थित होते आणि शाळेच्या वतीने आमदार साहेबांचे आभार मानण्यात आले.

> **“ आ विक्रम काळेसाहेबांचा हा जिव्हाळा कधीही न तुटणारा असतो केवळ मतदान पुरताच वापर करून कार्यकर्त्यांना सोडून द्यायचं असं कधीच होणार नाही गेल्या पंधरा वर्षापासून साहेबांच्या संपर्कामध्ये काम करत असताना योग्य तो न्याय आमदार साहेबांनी दिलेला आहे शिक्षकांसोबत व त्यांच्या कुटुंबासोबतचे प्रेम हे किती मोठ असते याचा अनुभव माझ्या लाडक्या कन्येच्या वाढदिवसाच्या भेटीतून साहेबांनी दाखवून दिलेले आहे त्याबद्दल काळे साहेबांची मी खूप खूप आभारी आहे**
>
> **प्रा. प्रवीण रंगराव बिरादार .**

# वाघजाई येथे सप्ताहानिमित्त न्या. डॉ.नामदेव महाराज शास्त्री व महंत कृष्णा महाराज शास्त्री यांची भेट

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**





प.पू. सद्गुरु वैकुंठवासी ह.भ.प. श्री संत भगवान बाबा भगवानगडकर व वैकुंठवासी ह.भ.प. वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्त वाघजई येथे अखंड हरिनाम सप्ताह संगीत रामायण व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा पार पडत आहे.

१४ जानेवारी पासून या सप्ताहाला सुरुवात झाली असून दिनांक ०१ जानेवारी रोजी ह.भ. प. विनोदाचार्य गंगाराम महाराज राऊत, दि. १५ जानेवारी रोजी ह. भ. प. सुशांत महाराज पवार, दि. १६ जानेवारी रोजी ह.भ.प. एकनाथ महाराज चत्तर शास्त्री यांची कीर्तन सेवा पार पडली असून पुढे नामांकित महाराजांची किर्तन सेवा पार पडणार आहे. यामध्ये ह. भ. प. निवृत्ती महाराज कोरडे, ह. भ. प. संतोष महाराज वनवे, ह. भ. प. रमेश महाराज जायभाये, भागवताचार्य ह.भ.प. अनिल महाराज चेके, ह.भ. प. महंत पांडुरंग महाराज यांची कीर्तन सेवा पार पाडण्यात आहे. दि. १८ जानेवारी रोजी भगवानगडाचे महंत न्यायाच्या डॉक्टर नामदेव महाराज शास्त्री हे वाघजाई नगरीत येणार असून त्यांच्यासोबत भगवानगडाचे उत्तर अधिकारी महंत कृष्णा महाराज शास्त्री हे सुद्धा येणार आहेत दुपारी दोन वाजेच्या सुमारास शास्त्रीजींचे वाघजई नगरीत आगमन होणार असल्याची माहिती श्री संत भगवान बाबा संस्थान व समस्त गावकरी मंडळी वाघजई यांनी दिली आहे.

## गोविंदराव भालेराव यांचे निधन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



कंधार तालुक्यातील पानशेवडी येथील रहिवाशी गोविंदराव हरीबा भालेराव (८० वर्ष) यांचे अल्प आजाराने दि. १६ जानेवारी २०२५ रोजी राहत्या त्यांचे राहत्या घरी निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर पानशेवडी येथील स्मशानभूमीत दुपारी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगी,तीन मुले,सूना नातू व नातवंडे असा मोठा परीवार आहे.ते जि.प.शाळा पांगरा येथील शिक्षक माधव भालेराव यांचे वडील होत.

# केकत जळगांवकरांनी भगवानगडाला दिली १ कोटी ११ लाख रुपयांची देणगी

## २६ कोटींचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भगवानगड । प्रतिनिधी**



श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या २६ कोटी रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.

श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे (केकत जळगांव ता.पैठण, जि. छ.संभाजीनगर) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही १ कोटी ११ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# सिंदखेड राजा मतदार संघातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था संत चोखामेळा ;राजे लखुजीराव जाधव यांच्या नावाने ओळखल्या जाणार ?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा । ज्ञानेश्वर बुधवत**




राज्य शासनाने कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्यामार्फत शासन निर्णय काढून राज्यातील १३२ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाची नावे बदलण्यास मान्यता दिली. त्यानुसार सिंदखेड राजा मतदार संघातील देऊळगाव राजा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला संत चोखामेळा तर सिंदखेड राजा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला राजे लखुजीराव जाधव शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थां असे नामकरण शासनाने केले आहे. देऊळगाव राजा येथील संस्थेला संत चोखामेळा व सिंदखेड राजा येथील संस्थेला राजे लखोजीराव जाधव नाव देण्यात यावी अशी मागणी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्याकडे माजी आमदार डॉक्टर शशिकांत खेडेकर यांनी केली होती

राज्य शासनाने १५ जानेवारी २०२५ रोजी कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग यांच्यामार्फत शासन निर्णय काढत राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंतर्गत शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेअंतर्गत या संस्थांमध्ये प्रशिक्षण देण्यात येते. अशा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा मुख्य उद्देश हा युवकांना रोजगारभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी सक्षम बनवणे व खाजगी औद्योगिक आस्थापनांना लागणाऱ्या कुशल मनुष्यबळांचा पुरवठा करणे असा आहे.

राज्यात ४१९ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व ५८५ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यरत आहेत. ८ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार शासनाने राज्यातील या औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे नावे बदलण्याचा विचार केला होता. याच अनुषंगाने १५ जानेवारी २०२५ रोजी शासन निर्णयाद्वारे राज्यातील १३२ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नावे बदलण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार सिंदखेड राजा मतदार संघातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला संत चोखामेळा यांचे जन्मस्थळ असलेल्या देऊळगाव राजा तालुक्यातील संस्थेला संत चोखामेळा तर छत्रपती शिवरायांचे आजोळ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राजे लखोजीराव जाधव यांना सिंदखेड राजा येथील संस्थेला नाव देऊन एक प्रकारे त्यांचा सन्मानच केला असल्याचे बोलले जात आहे. माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर यांच्या प्रयत्नाला हे मोठे यश असे सांगितल्या जात आहे.

# चिखली येथे ११ ते१८ जानेवारी या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह

## गाथाभजन,ज्ञानेश्वरी पारायण,धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

अत्यंत व्यस्तता असून देखील त्यांनी शिवाजी महाराज यांनी वेळात वेळ काढून चिखली येथील सेवेसाठी निश्चित केल्याबद्दल मनापासून आनंद होत आहे.सनातन धर्मामधील जाचक आणि क्लिष्ट संदर्भ अत्यंत सोपे करून सांगण्याचे ह.भ.प. शिवाजी महाराज कोकणे यांचे कौशल्य आहे.आष्टी तालुक्यातील चिखली (हनुमंतगांव) येथे सनातन,वैदिक परंपरेतील कठीण साधनेला सुलभ करून संतांनी कलीयुगातील सर्व सामान्य भाविकांच्या उद्धारासाठी सर्व समावेशक भागवत सांप्रदयाची उभारणी केली.या सुलभ साधनेतून समाज मनात सांप्रदयाविषयी प्रेमयुक्त आस्था निर्माण केली.किर्तन हे अत्मोधाराचे सुलभ साधन म्हणून सांप्रदायिक समाजाने अंगीकारलेली उपासना आहे.काळाच्या ओघात वारकरी सांप्रदयाचा आधार घेवून पंतोपंथ वेगळे अस्तित्व निर्माण करू पाहत आहेत अशा संक्रमण प्रसंगी महाराष्ट्रातील अनेक संत महंत सत्पुरुषांनी वारकरी संप्रदयाला सतत तेजोमय ठेवून समाजाला व्यसनमुक्ती आदर्श व्यवहार, समाजभिमूख सृजनशिलता,सोज्वळ व प्रांजळ उपासना मातृ-पितृ सेवा करण्यास प्रवृत केले.आष्टी तालुक्यातील चिखली येथे त्या तेजोमय व दिव्य परंपरेला स्मरुन ज्ञानेश्वरी पारायणानिमीत्त या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. संत परंपरेनुसार धार्मिक भावना निर्माण करण्याचे महान कार्य ह.भ.प. कोकणे महाराज करत आहेत.त्यांच्या कीर्तन सेवेमुळे चिखली येथील अखंड हरिनाम सप्ताह आणि ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झालेले आहे अशी भावना ग्रामस्थांनी यांनी व्यक्त केली आहे.या सप्ताहात काकडा भजन,विष्णु सहस्रनाम,ज्ञानेश्वरी पारायण,गाथा भजन, प्रवचन,हारिपाठ,हरिकीर्तन व हरिजागर आदि धार्मिक कार्यक्रम होत आहेत.या सप्ताहात शनिवारी नामधारक संत ह.भ.प.आसाराम महाराज केळसांगवीकर यांचा नमजप,रविवारी ह.भ.प.श्रीहरि पुरी महाराज,सोमवारी ह.भ.प.ओम महाराज नन्नवरे,मंगळवारी समाजसेवक बबनदादा शिंदे यांच्या कीर्तन सौजन्याने खानापूर येथीला ह.भ.प.वेदिका महाराज तावरे यांचे हरिकीर्तन झाले.बुधवारी ह.भ.प.अशोक महाराज झांबरे यांचे हरिकीर्तन झाले.आज गुरुवार दि.१६ जानेवारी रोजी ह.भ.प.शिवाजी महाराज कोकणे यांचे तर शुक्रवारी ह.भ.प. आजिनाथ महाराज दानवे यांचे हरिकीर्तन होणार आहे.शनिवारी सकळी १० ते १२ या वेळात ह.भ.प.प्रकाश महाराज जंजीरे पिंपळवंडी यांचे सुश्राव्य काल्याचे कीर्तन होणार आहे.काल्याचे कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे.यावेळी आ,सुरेश धस,माजी आ,बाळासाहेब आजबे, माजी आ.भीमराव धोंडे,माजी आ.साहेबराव दरेकर व युवानेते सतीषआबा शिंदे हे उपस्थित राहणार आहेत.

# किनवट तालुक्यातील वनपरिक्षेत्र आप्पारावपेठ (प्रा.)अंतर्गत राखीव वनात ट्रेकिंग घेण्यात आली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । प्रतिनिधी**

नांदेड विभागामार्फत नियतक्षेत्र-मलकजाम कक्ष क्र २९७ ए नियतक्षेत्र-कंचली,कक्ष क्र. २९७ बी.नियतक्षेत्र तल्लारी कक्ष क्र.३०३,३०४ तसेच वनपरिक्षेत्र इस्लापूर अंतर्गत नियतक्षेत्र-चिखली कक्ष -३०१,३०२नियतक्षेत्र-गोंडेमहागांव,कक्ष क्र ३०५,३०६ एफडीसीएम सोनवाडी नियतक्षेत्र-तोतंबा कक्ष क्र.३१२ ए,३१३ नियतक्षेत्र- हुडी कक्ष क्र.३१२ बी./१,३१४ मधील राखीव वनात फिरती ट्रेकिंग करण्यात आली, त्यामधे मा.



उपवनसंरक्षक वाबळे, मा.सहाय्यक वनसंरक्षक इटलोड , मा. सहाय्यक वनसंरक्षक (जं.का.स व कॅम्पा) किनवट गिरी, नांदेड वन विभागातील व.प.अ इस्लापूर,धनगे , व.प.अ अप्पारावपेठ ढगे , व.प.अ बोधडी पोतुलवार , व.प.अ किनवट राठोड , व.प.अ. हिमायतनगर चव्हाण, व.प.अ हदगांव कटके ,व.प.अ. नांदेड शिंदे साहेब व अप्पारावपेठ वनपरीक्षेत्रातील वनपाल व वनरक्षक तसेच इस्लापूर वनपरिक्षेत्रातील वनपाल, वनरक्षक, वाहनचालक,वनमजुर उपस्थित होते.सदरची ट्रेकिंग करत असताना योग्य त्या सूचना देऊन मार्गदर्शन केले.

# पंचायत समिती लोहा तर्फे प्रगतिशील शेतकरी रत्नाकर पाटील ढगे यांचा सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

बायोऊर्जा व शेद्रिय शेती मध्ये उत्तम कार्य केल्या बदल महामहीम राष्ट्रपती यांनी २६ जानेवारी २०२५ रोजी प्रजासत्ताक दिन कार्यक्रमाचे दिवशी राष्ट्रपती भवन येथे निमंत्रित केल्याबद्दल सायाळ येथील युवा प्रगतीशील शेतकरी रत्नाकर गंगाधर पाटील ढगे यांचा पंचायत समिती कार्यालय लोहा यांच्या वतीने लोहा पंचायत समितीचे कृतव्यदक्ष गटविकास अधिकारी आडेराघो यांच्यावतीने यथोच्छित सत्कार करण्यात आला या वेळी पंचायत समितीचे कृषी



विकास अधिकारी शैलेश वावळे, विस्तार अधिकारी पाठक, देशपांडे, टेबुर्णे, महेत्रे, परशुराम वाडीकर, सुतार मँडम विस्तार अधिकारी पंचायत समिती लोहा हनुमंत पवार सायाळकर पत्रकार गणपत जामगे यांची उपस्थिती होती, यावेळी मनोगत व्यक्त करताना रत्नाकर पाटील ढगे यांनी सांगितले की, देशाच्या सवोच्च अशा राष्ट्रपती भवनातील कार्यक्रमात मला बोलावून मातीत काम करणाऱ्या शेतकरी बांधवाचा सन्मान करण्यासाठी देशाची राजधानी दिल्लीत बोलविण्यात येत असल्याने महामहिम राष्ट्रपती यांचे जाहीर आभार मानतो व यापुढे शेतीमध्ये भरीव कार्य कारण्याचा मी संकल्प केला आहे असे रत्नाकर पाटील ढगे यांनी सांगितले,

# वाचनातून व्यक्तिमत्त्व विकसित होण्यास मदत होते-डॉ.भोपाळे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**

व्यक्तीचा भावनिक, वैचारिक, सामाजिक आणि बौध्दिक विकास हा वाचनातून होतो. ज्या क्षेत्रात विकास करायचा आहे, त्या क्षेत्रातील ग्रंथसंपदेचे वाचन, मनन आणि चिंतन केल्यास त्या त्या क्षेत्रात यश प्राप्त होते. म्हणून सतत वाचन करावे. वाचनातून माणूस समृध्द होतो, असे प्रतिपादन सुप्रसिध्द लेखक डॉ. हनुमंत भोपाळे यांनी केले. ते अर्धापूर येथील शंकरराव चव्हाण महाविद्यालयाच्या मराठी विभागाने आयोजित केलेल्या 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत 'लेखक आपल्या भेटीला' कार्यक्रमात निमंत्रित लेखक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. जे.सी. पठाण होते. याप्रसंगी विचारपीठावर डॉ. रघुनाथ शेटे, डॉ. साईनाथ शेटोड, डॉ. संगीता घुगे, डॉ. एस.पी. औरादकर, डॉ. काजी मुक्तारोदिन यांची विशेष उपस्थिती होती. या प्रसंगी डॉ. हनुमंत भोपाळे यांनी महाविद्यालयास ग्रंथ भेट दिली. डॉ. भोपाळे पुढे बोलताना म्हणाले की, शब्दांची कलात्मक गुंफन करून लेखक होता येते. लेखनाला संघटनशक्तीची जोड असणे आवश्यक आहे. माणूस जोडणे म्हणजे देश जोडणे होय. शासन वाचन संस्कृती विकसित करण्यासाठी प्रयत्न करत आहे, ही बाब स्तुत्य आहे. वाचन संस्कृतीबरोबर कालानुरूप लेखन झाले पाहिजे, यासाठी लेखन संस्कृती जोपासण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. अध्यक्षीय समारोप करताना प्रभारी प्राचार्य जे.सी. पठाण म्हणाले प्रोफेसर हनुमंत भोपाळे यांनी शंकरराव चव्हाण महाविद्यालयाच्या पायाभरणीपासून महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. प्रभारी प्राचार्य म्हणून त्यांनी अनेक उपक्रम राबवले. वाचनसंस्कृती रूजवण्यासाठी ग्रंथभेट देतात आणि लेखनही करतात. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात ध्येयप्राप्तीसाठी सतत वाचन, लिखाण करावं, असे आवाहनही त्यांनी विद्यार्थ्यांना केले. प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभागप्रमुख डॉ. ल.ना. वाघमारे यांनी केले, तर आभार डॉ.संगीता घुगे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. उमाकांत शेळके, बालाजी कवठेकर आदींनी परिश्रम घेतले. यावेळी प्राध्यापकवृंद आणि बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# नांदेड जिल्हातील पदाधिकाऱ्यांनी घेतली अजित पवार साहेब यांची भेट



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.अजित दादा पवार साहेब यांची मुंबई येथील मंत्रालयात नांदेड जिल्हातील पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली. तसेच विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.यावेळी लोहा विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, माजी जिल्हा परिषद सभापती शिवराज पाटील होटाळकर, एडवोकेट मुक्तेश्वरराव धोंडगे, नांदेड शहर वाघाळा महानगर पालिकेचे माजी उपमहापौर सुरजितसिंघ गिल, माजी सभापती अशोक पाटील मुगावकर आदींचा समावेश होता.

# आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्याचे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कुंडलवाडी । गंगाधर दुसलवाड**

मिनकी ता बिलोली जिल्हा नांदेड येथील शेतकरी कुटुंबातील आत्महत्याग्रस्त राजेंद्र पैलवार व ओमकार राजेंद्र पैलवार या पिता पुत्रांच्या कुटुंबाला शेतकरी चळवळीतील मित्रांनी भेट दिली. त्या कुटुंबाची घरची परिस्थिती पाहून मन सुन्न झाले. एका कोवळ्या मुलासह कुटुंबाचा कर्ता पुरुष गेल्यानंतर घरात असलेली म्हातारी आई, तरुण पण हतबल झालेली पत्नी, एक दहावीत शिकणारा व एक बारावीत शिकणारा मुलगा. घरात चार दिवसाचे राशन पाणी नाही. ब्यांकेचे व खाजगी कर्जाचा डोंगर पुढे पडलेला. आता कुटुंबाला जगवावं कसं हा प्रश्न समोर त्या हतबल झालेल्या माऊलीच्या पुढे पडलाय. शेतामध्ये तुरीचे पीक कापून ठेवलेले. पण घरी दोन दोन मृत्यू झाले असल्यामुळे शेतात



कुणीही गेले नसल्यामुळे रोही, हरीण यासह इतर वन्यप्राण्यांनी तुरीचे पीक फस्त करून टाकलंय. आता कुठूनही उत्पन्न मिळण्याची दुसरी व्यवस्था त्यांच्याकडे नाहीय.

म्हणून माझी दैनिक लोकनेता पेपर च्या माध्यमातून आपणा सर्वांना अशी विनंती आहे की आपण सर्वांनी फुल न फुलाची पाकळी असं समजून त्या कुटुंबास आर्थिक मदत करावी. झालेली घटना खूपच दुर्दैवी आहे. आपण त्या कुटुंबाचा गेलेला आधार तर परत मिळवून देऊ शकत नाही परंतु थोडी थोडी सर्वांनी मदत करून त्यांच्या जीवनात थोडा फार जगण्याचा विश्वास निर्माण करुन देऊ शकतो असं मला वाटतंय.

# जिओचे नेटवर्क डाऊन, ग्राहक वैतागले

## अन्यथा जियो सीम पोर्ट करण्याचा दिला ईशारा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोरी । गौतम गावंडे**

बिलोली शहर व परिसरातील जिओ कंपनीच्या मोबाईल नेटवर्कचा सातत्याने खेळ होत असल्याने ग्राहक मात्र वैतागले आसुन कंपनीच्या ठिसाळ नियोजना विरोधात नेटवर्क सुविधा पुरवत नाही केल्यास जिओ पोर्ट आंदोलन करण्याचा इशारा ग्राहकांनी दिला आहे .

शहरात गेल्या अनेक महिण्या पासुन जिओ नेटवर्कीग सेवा विजेवरच अवलंबुन आसल्याने नैसर्गिक अपती आसो या कुठलीही विज पुरवठा खंडित असो समस्या निर्माण झालेली आसेल आशा परस्थितीत जो पर्यत विज पुरवठा सुरळीत होणार नाही तो पर्यत मोबाईलची नेटवर्किंग सेवा बंदच रहात



असल्याचे दिसून येते.मोबाईल कंपनीकडुन जनरेटरची सुविधा उपलब्ध झाल्यास मोबाईलची सेवा सुरळीत आसते पण या सुविधेच्या अभावामुळे मोबाईल नेटवर्क बंदच होत आसल्याने सध्याचे जनजिवन हे मोबाईलवर अवलंबुन असल्या कारणाने ग्राहकांना अनेक अत्यवश्यक बाबीसह आनेक वेगवेगळ्या समस्याना सामोरे जावे लागत आसुन बिलोली शहरासह तालुक्यातील हि जिओ नेटवर्कीग सेवा तात्काळ सुरळीत नाही झाल्यास अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीच्या वतिने व ग्राहकांच्या वतिने येत्या काही दिवसात विविध मार्गाने तिव्र अंदोलन छेडण्याचा ईशारा राष्ट्रीय सरचिटणीस राजु पाटील शिंपाळकर, जिल्हाअध्यक्ष शंकरराव मावलगे ,सामाजिक कार्यकर्ता सय्यद रियाज यांनी दैनिक लोकनेता न्यूज नेटवर्कशी बोलताना म्हणाले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904